महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

ब तिसरा मजला, तंत्र शिक्षण मंडळाची इमारत,
शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/लेखा २/२०२३/ 3063 दिनांक १४/०७/२०२३ 14 JUL 2023

परिपत्रक/ तातडीचे

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय तंत्र निकेतने,
पुणे विभाग, पुणे.

विषय :-सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी संस्थेच्या स्विय प्रपंजी लेखा निधीतून विहीत बाबींवर करावयाच्या खर्चासाठीच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

संदर्भ : - ०१.या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/लेखा२/२०२३/३०४५ दिनांक १३/०७/२०२३
०२.तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई पत्र क्र.१०/तंशिसं/स्वियप्रलेखा/अंदाजपत्रक२३-२४/२०२३/५८१ दिनांक १४/०७/२०२३

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ०१ पहावे. तसेच संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ ची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी संस्थेच्या स्विय प्रपंजी लेखा निधीतून विहीत बाबींवर करावयाच्या खर्चासाठीच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत संस्थांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात आलेले आहेत. मात्र संचालनालयाने संदर्भिय पत्र क्रमांक ०२ मधील दिलेल्या निर्देशानुसार तातडीने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन विभागीय कार्यालयास दिनांक १९/०७/२०२३ पर्यंत विहीत नमुन्यात व या कार्यालयाने संदर्भ क्रमांक ०१ च्या पत्रात नमुद केलेल्या विहीत फॉन्ट मध्ये २ प्रतीत माहिती स्फॉप्ट कॉपी सह सादर करावी.

सुधारीत अंदाजपत्रक वेळेवर पाठविण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची आहे. अपूर्ण माहिती अभावी संस्थांच्या खर्चाच्या अदांजपत्रकाला मान्यता प्राप्त न झाल्यास याची जबाबदारी संस्थां प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत - संचालनालयाचे संदर्भिय पत्राची प्रत

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ: https://dte.maharashtra.gov.in

क्र.१०/तंशिसं/स्वियप्रलेखा/अंदाजपत्रक२३-२४/२०२३/५८९ दिनांक:- 14 JUL 2023

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,औरंगाबाद,नाशिक,नागपूर व अमरावती

विषय : **सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी संस्थेच्या स्विय प्रपंजी लेखा निधीतून विहीत बाबींवर करावयाच्या खर्चासाठीच्या वार्षीक अंदाज पत्रकास मान्यता देणेबाबत.**

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र.१०/पीएलए/अंदाजपत्रक२०२३-२४/२०२३/२३६, दि. २३.३.२०२३

२. शासन निर्णय, उ.व तं.शि.वि.क्र.पीएलए-२०१५/(प्र.क्र.१६८/२०१५)/तांशि-३, दि.१/१/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णयान्वये संचालनालयाच्या सदर्भीय क्र.१ च्या पत्रानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी पदवीका संस्थांच्या स्विय प्रपंजी लेखा निधीतून विहीत बाबींवर करावयाच्या खर्चासाठीच्या वार्षीक अंदाज पत्रकास मान्यता प्राप्त करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय कार्यालयांमार्फत मागविण्यात आला होता.त्यास अनुसरुन आपल्या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय पदवीका संस्थांचा एकत्रीत प्रस्ताव या संचालनालयाला प्राप्त झालेला आहे.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे अवलोकन केले असता वार्षीक खर्चाच्या अंदाजपत्रकाच्या प्रपत्र "अ" व प्रपत्र "ड" मधील **रकाना क्रमांक ४ "प्रत्यक्ष प्रस्तावीत कामाचे विवरण"** या रकान्यात काही संस्थांनी कामासाठी प्रस्तावीत केलेल्या रकमेच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची विस्तृत माहिती नमुद केल्याचे दिसून येत नाही. तसेच काही संस्थांनी खर्चाची बाब आहे तशीच रकाना क्र.४ मध्ये दर्शवीलेली आहे.त्यास अनुरुन आपणांस या पत्रान्वये कळविण्यात येते की संस्थांकडून प्राप्त अंदाजपत्रक प्रस्तावाची आपल्या स्तरावरुन पुनश्च पडताळणी करावी व प्रपत्र "अ" व "ड" मधील रकाना क्र.४ प्रत्यक्ष प्रस्तावीत कामचे विवरण तक्यात आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील अपेक्षीत खर्चाच्या कामाचे थोडक्यात विवरण कामाच्या अंदाजीत रकमेसह नमुद करण्याबाबतच्या सुचेना संबंधीत संस्थांना तात्काळ निर्गमीत करुन परीपूर्ण अंदाजपत्रक प्रपत्र अ व प्रपत्र ड संचालनालयाला कार्यासन क्रमांक १० च्या ( desk10@dtemaharashtra.gov.in ) ई मेल पत्त्यावर सादर करावे.

अंदाजपत्रकाला मान्यता देण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर लवकरच समीती गठीत करुन पुढील कार्यवाही करावयाची असल्याने दि.२४.७.२०२३ पर्यंत दुरुस्तीसह तयार केलेले अंदाजपत्रक या संचालनालयाला पाठविण्याची दक्षता घ्यावी. तसेच अपूर्ण महिती अभावी संस्थांच्या खर्चाच्याअंदाजपत्रकाला मान्यता प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील यांची नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ.गोविंद संगवई )
प्र.उपसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
14 JUL 2023
आवक क्र. ६७६२

c:\users\desk10\desktop\pla budget2324\pla budget 2023-24.docx